**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३२१/२०२३**
**निशाणी क्र. १८**

**दोषारोपापूर्वीचा पुरावा**

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक शपथेवर निवेदन करतो की,

नाव- अंकुश यशवंत जगदाळे,

वय- ७६ वर्षे, धंदा - शेती,

राहणार – डंगीरेवाडी, ता. माण, जि. सातारा.

**साक्षीदाराचा सरतपास फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री. एम. एन. गेजगे,**

घटना दिनांक २४/०५/२०२३ रोजी मौजे डंगीरेवाडी गावात खैरोबा वस्ती येथे गट नंबर ४७३ मध्ये सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास घडली. आरोपी व माझ्यात बांधावर इलेक्ट्रीक पोल लावलेला होता. सदरचा पोल आरोपींनी माझ्या शेतात रोवला. मी आरोपींना त्याबद्दल विचारले असता त्यांनी मला शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच आरोपींनी मला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी दहिवडी पोलीस ठाण्यात गेलो. पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली नाही. त्यांनी अदखलपात्र गुन्हयाची नोंद करून घेतली. त्यानंतर पोलिसांनी मला न्यायालयात केस दाखल करण्यास सांगितले.

सरतपास पूर्ण.

**आरोपीच्या विधिज्ञांनी साक्षीदाराचा उलटतपास दोषारोपापर्यंत राखीव ठेवण्याची विनंती केली त्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास दोषारोपापर्यंत राखीव ठेवण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

सही/-
(ए. वाय. शेख)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दहिवडी

दहिवडी.
दिनांक- १७/०४/२०२५